**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं.(०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, E-mail-purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागासाठी सन २०१९-२० करिता माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२०) भाजीपाला प्रत्येक तीन महिन्याचे चार टप्प्यामध्ये खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – रु.१६,५००/-, (रु.सोळा हजार पाचशे मात्र)

**बयाणा रक्कम** – रु.१,६५,०००/- (रु.एक लाख पासष्ट हजार मात्र)

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि. २५/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. १४/०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी व बयाणा रक्कम www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.१८/२/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत: / पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

Rubal

**(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)


**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


**श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागासाठी**

## सन २०१९-२० भाजीपाला

**चार टप्प्यामध्ये खरेदीबाबत ई-निविदा**

१. १ एप्रिल -२०१९ ते ३० जुन-२०१९ – तीन महिने

२. १ जुलै -२०१९ ते ३० सप्टेंबर–२०१९ – तीन महिने

३. १ ऑक्टोंबर -२०१९ ते ३१ डिसेंबर-२०१९ – तीन महिने

४. १ जानेवारी -२०२० ते ३१ मार्च-२०२० – तीन महिने

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदा फी रक्कम रु.१६,५००/- (रु.सोळा हजार पाचशे) मात्र व बयाणा रक्कम रु. १,६५,०००/- (रू.एक लाख पासष्ट हजार) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

४. सदर निविदा दि.२१ / ०१ / २०१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. १४/ ०२/२०१९ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. शक्य झाल्यास दि. १६/ २ /२०१९ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा **निविदा विचारात घेतली जाणार नाही.**

७. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये विहित फॉर्म मध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

८. ई-निविदेसाठी BOQ चे एप्रिल-२०१९ ते जुन-२०१९, जुलै-२०१९ ते सप्टेंबर-२०१९, ऑक्टोबर-२०१९ ते डिसेंबर-२०१९, जानेवारी-२०२० ते मार्च-२०२० असे चार भाग करण्यात आले असुन, निविदा भरतांना प्रत्येक निविदाधारकाला पार्ट वाईज दर भरावे लागतील.

९. कोणतीही निविदा अंशत: अथवा सर्व निविदा स्विकारणे किंवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती.रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
## शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर

### निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे भाजीपाल्याचा तपशिल सोबतचे परिशिष्टात चार स्वतंत्र BOQ मध्ये दिलेला आहे. त्यानुसार निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.१६,५००/- (रु.सोळा हजार पाचशे) मात्र व बयाणा रक्कम रु. १,६५,०००/- (रू.एक लाख पासष्ट हजार) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना/ ATMA (Agricultural Technology Management Agency) किंवा महाराष्ट्र राज्य कृषी विभाग पणन महामंडळ यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र/तत्सम शासकीय परवाना, GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt (आवश्यकतेनुसार), पॅन कार्ड, इ. कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

४. एप्रिल-२०१९ ते जुन-२०१९, जुलै-२०१९ ते सप्टेंबर-२०१९, ऑक्टोबर-२०१९ ते डिसेंबर-२०१९, जानेवारी-२०२० ते मार्च-२०२० अशा प्रत्येक तीन महिन्याचे कालावधीत भाजीपाला पुरविणेसाठी BOQ चे चार भाग करण्यात आले आहेत. निविदाधारकास सदर निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी Online चार BOQ मध्ये दर भरावे लागतील. निविदाधारक कुठल्याही भागासाठी/भागांसाठी निविदा सादर करु शकतो. तथापि निविदा फी व बयाणा रक्कम ठरविलेप्रमाणेच राहिल.

५. प्रत्येक भागाचे कालावधीसाठी BOQ मध्ये भरलेल्या दरांचा तुलनात्मकदृष्टया स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल.

६. भाजीपाल्याचे **प्रती किलोचे सर्व करांसह शिर्डी संस्थानचे प्रसादालय विभागात पॅकिंग व फॉरवर्डींगसह पोहोचचे सर्व समावेशक दर द्यावेत.** मार्केट सेस, मापाई अथवा कोणताही फंड, GST/इतर टॅक्स, जकात, वाहतूक खर्च वगैरेची जादा रक्कम वेगळी लावता येणार नाही. **माल उतरविण्याची वाराई पुरवठाधारकास द्यावी लागेल.**

७. कोणतीही निविदा अंशत:/ पूर्णपणे मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

८. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

९. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांची निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत भाजीपाल्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम भाजीपाल्याचा पुरवठा पुर्ण केलेनंतर व करार कालावधी संपल्यानंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१०. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरित शिर्डी येथे समक्ष येऊन, रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

११. ज्या भाजीपाला मालाच्या निविदा मंजुर होतील तो सर्व माल चांगल्या दर्जाचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा किंवा खराब माल स्विकारला जाणार नाही. असा माल पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्या मालाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

...२...

८१

१२. **प्रत्येक आठवडयात दोन वेळेस (गुरुवार व रविवार) अगर संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे भाजीपाल्याची मागणी केली जाईल. संस्थानचे प्रसादालय विभागाकडील गरजेनुसार भाजीपाला पुरवावा लागेल.**

१३. **शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या गर्दीवर सदर प्रसाद भोजनाची सेवा अवलंबून असल्यामुळे भाजीपाला मागणी निविदेमध्ये अंदाजे नमुद करण्यात आलेली आहे. तथापी निविदा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा भाजीपाल्याची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या भाजीपाल्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेला सर्व माल घेणे, संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.**

१४. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच भाजीपाल्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

१५. शासन नियमानुसार लागू असलेल्या कपाती बिलातून करण्यात येतील.

१६. निविदाधारकांच्या अटी/शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाहीत.

१७. पुरविणेत येणारा भाजीपाला ताजा, स्वच्छ व चांगल्या दर्जाचा असावा. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेला भाजीपाला कमी प्रतीचा आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची राहील. तसेच किड असलेला भाजीपाला स्विकारला जाणार नाही.

१८. **सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

१९. पुरवठाधारकाने भाजीपाला दर्जा, वर्णनाप्रमाणे व Delivery Schedule प्रमाणे पुरविला नाही तर संस्थान पर्यायी भाजीपाला उपलब्धतेसाठी सदर करार रद्द करील व याकामीचे अतिरिक्त खर्चाची वसुली संबंधित पुरवठाधारकाकडून करील.

२०. भाजीपाला पुरविणेचे मागणी प्रसादालय विभागाकडून तीन दिवस अगोदर देण्यात येईल व त्यामध्ये दिलेले Schedule प्रमाणे भाजीपाला पुरवठा करावा लागेल.

२१. प्रसादालय विभागाने कळविलेले Schedule प्रमाणे भाजीपाला पुरवावा लागेल तसेच भाजीपाला पुरवठा Food & Adulteration Act व शासन Food Safety Regulations प्रमाणे पुरविणे बंधनकारक राहील. याबाबत काही प्रसंग उद्भवल्यास ही संपूर्ण जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

२२. भाजीपाला पुरवठा आदेशाचे बदली पुरवठा धारकाने दुसरा भाजीपाला पुरविल्यास तो स्वीकारला जाणार नाही

२३. प्रसादालयाला भाजीपाला पुरविलेनंतर २१ दिवसांत बील आदा करणेचा प्रयत्न राहील.

२४. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी Technical Bid उघडल्यानंतर १८० दिवसांचा राहील.

२५. संस्थानचे प्रसादालयातील पर्यवेक्षक/आचारी पुरवठा आदेश दिलेले वर्णनाप्रमाणे भाजीपाल्याची तपासणी करतील व ताब्यात घेतील. भाजीपाला स्विकारणेबाबत अधिक्षक, प्रसादालय यांचा निर्णय अंतिम राहील.

२६. निविदेत दिलेले वर्णन, दर्जा, कालावधी, निविदा अटी-शर्ती, **Quantity, Schedule** सर्व टॅक्सेससह शिर्डी येथे भाजीपाला पोहोच करणे, हमाली वगैरे सर्व बाबींचा निविदाधारकाने काळजीपूर्वक अभ्यास करुन दर भरावेत.

२७. प्रसादालयात पुरविणेत येणारा भाजीपाला स्वच्छ पोते व कॅरेटमध्ये, प्रवासात खराब होणार नाही अशी काळजी घेऊन त्या पद्धतीने पुरवावयाचा आहे. तसेच भाजीपाला धुताना स्वच्छ चांगल्या पाण्याचा वापर करावा.

२८. निविदेमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक **Item wise** न्युनतम दर विचारात घेऊन पुरवठा आदेश देण्यात येतील. त्याप्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील.

...३...

२९. निविदेसंबंधी काही माहिती पाहिजे असल्यास/ शंका असल्यास खरेदी विभाग दुरध्वनी क्रमांक ०२४२३-२५८७७१/७२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

३०. ऑनलाईन कमर्शियल निविदा दर भरताना काळजीपुर्वक भरावी. निविदेचे अंतिम तारखेनंतर याबाबत दर कमी नमुद केले आहेत किंवा दराबाबतची कुठलीही विनंती कुठल्याही परिस्थितीत ग्राह्य धरली जाणार नाही.

३१. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात तुप पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

३२. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

**३३. निविदाधारकाने पुरविलेला भाजीपाला संस्थानने नाकारला व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला स्थानिक बाजार समितीतून अगर बाजारभावाने दुसरीकडून माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल व २ ते ५ % पर्यंत दंडाची रक्कम संबंधीत पुरवठाधारकाकडून वसुल करण्यात येईल.**

३४. निविदेतील मंजुर दराने भाजीपाला पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने भाजीपाला पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने भाजीपाला खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

३५. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक भाजीपाला पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

३६. पुरवठा आदेशातील भाजीपाला मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या भाजीपाल्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या भाजीपाल्याची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बँक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०१९

ठिकाण :- निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना/
ATMA/महाराष्ट्र राज्य कृषी विभाग पणन महामंडळ यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र/
तत्सम शासकीय परवाना

२. GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती (आवश्यकतेनुसार)

३. पॅन कार्ड

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०१९-२० (माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२०) करिता श्री साई प्रसादालय विभागासाठी भाजीपाला पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेला भाजीपाला, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे गरजेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे प्रसादालयात पोहोच करण्याची हमी देतो. सदर भाजीपाल्याचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त भाजीपाल्याची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या भाजीपाल्याच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने भाजीपाल्याचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर भाजीपाल्याच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटराईज्ड करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत मागणीप्रमाणे भाजीपाला वेळेवर शिर्डी येथील प्रसादालय विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



४/४/१